महाराष्ट्र टाइम्स ★ नागपूर ★ शुक्रवार, २० जानेवारी २०१७

# सोळा वर्षांनी जमला कट्टा

कट्टा गँग

▶▶ पंकज मेंढे (भैसारे), नागपूर



मी तिरपुडे कॉलेज ऑफ सोशल वर्क या महाविद्यायातून १९९७-९९ या काळात एमएसडब्ल्यू केले. शिक्षणाच्या निमित्ताने दोन वर्षे एकत्र घालवल्यानंतर नोकरी आणि करिअरच्या शोधात वर्गातील सर्व मित्र-मैत्रिणी विखुरलो. अनेक जण बाहेरगावी राहणारे असल्यामुळे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते आपापल्या गावी परतले. तेव्हापासून दोन तीन मैत्रिणी वगळता इतर कोणाशीही माझा संपर्क नव्हता.



एके दिवशी माझी मैत्रिण रचना धडाडे हिचा फोन आला. तिरपुडे कॉलेजमधील १९९७-९९ बॅचचे एकत्रीकरण होणार असल्याचे तिने सांगितले. ही बातमी ऐकताच १६ वर्षांनी जुन्या मित्र-मैत्रिणींना भेटण्याची मला ओढ लागली होती. गेट टुगेदरची बातमी कळल्यापासून प्रत्यक्ष दिवस उगवण्यापर्यंत गतकाळातील अनेक आठवणी दाटून आल्या. अखेर तो दिवस उगवला. रचना धडाडे, स्मिता चौधरी, रोहित उपाध्याय, दीपक नेगी, विलास घोडेस्वार, तरुणा मेश्राम, वर्षा पगाले, ईश्वर तायडे, विष्णू गोटाफोडे, शिल्पा, विशाल थोरात, संजय फुलकर, माधुरी खांडेकर, रेणुका, विद्या चौरासिया, सूरज ईटनकर या सर्वांना भेटून आनंद झाला. विद्या चौरासिया तर थेट युकेमधून या गेटटूगेदरसाठी नागपुरात आली होती. यातील अनेक जण आता आपापल्या क्षेत्रात स्थिरावले आहेत. शिक्षण, राजकारण, सरकारी नोकरी, मीडिया अशा सर्वच क्षेत्रात आमच्या बॅचमधील मंडळी असल्याचे कळले.

गप्पागोष्टी सुरू असतानाच प्रत्येकाने शिक्षण पूर्ण झाल्यानंतर आतापर्यंतची वाटचाल प्रत्येकाने सांगितली. गप्पागोष्टी, थट्टामस्करी करताना वेळ कसा गेला हे कळलेच नाही. रात्री उशीर झाल्याने पुन्हा भेटायचे ठरवून आम्ही एकमेकांचा निरोप घेतला. व्हॅटसॲपवर 'टीसीएसडब्ल्यू १९९७-९९ एमएसडब्ल्यू बॅच' या नावाने ग्रुपही तयार झाला. आता या ग्रुपच्या माध्यमातून आम्ही एकमेकांची ख्याली-खुशाली विचारत असतो.

### कट्टा गँग

कट्टा हा जिवाभावाचा दोस्त. आपल्या ग्रुपचा महत्त्वाचा मेंबर. कट्ट्यावर जाण्याचे दिवस संपले, तरी त्या कट्ट्याची आठवण मनातून कधीच पुसली जात नाही. आपल्या कट्ट्याविषयी वाटणारा मनापासूनचा जिव्हाळा, तिथे केलेला किंवा करत असलेला दंगा हे सारं लिहा आणि द्या पाठवून आमच्याकडे. तुमच्या कट्ट्याला आमच्या कट्ट्यावर नक्की जागा मिळेल.